# राजमती पाटील : जैन श्राविकाश्रम ते येरवडा जेल (एक क्रांतिकारी प्रवास)

**सुशांत शंकर कदम,**
संशोधक विद्यार्थी,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मो.नं. ९०४९१०७३६९

**प्रस्तावना :**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील शेवटचे पर्व म्हणजे १९४२ चे छोडो भारत आंदोलन होय. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनात ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'भारत छोडो' प्रस्ताव मंजूर करून घेतला. व भारतीय जनतेला गांधीजींनी आम्ही हिंदूस्थानला स्वतंत्र करू अथवा स्वातंत्र्य मिळविताना मरून जाऊ आता गुलामगिरीत राहू शकत नाही. असा संदेश दिला. गांधीजींच्या या 'करा किंवा मरा' या घोषणेने अनेक पुरुष घर संसार सोडून या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले. या लढ्यात पुरुषांच्या बरोबरीने अनेक स्त्रियांनीही सहभाग घेतला. ९ ऑगस्ट रोजी सकाळी मुंबईच्या गोवालिया टँक (सध्याचे क्रांति मैदान) येथे अरुणा असफअली यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. "शुरू हुआ है जंग हमारा" अशी त्यांनी घोषणा केली. दळणवळणाची साधने नष्ट करून सरकारची प्रशासकीय यंत्रणा खिळखिळी करावी, तसेच भारत स्वातंत्र्य झाल्याशिवाय हा लढा थांबवू नये अशी घोषणा केली. इंग्रजांनी आंदोलन दडपून टाकण्यासाठी प्रमुख नेत्यांना अचानक पकडून अज्ञातस्थळी बंदीवासात टाकले. त्यामुळे सर्वत्र निषेध मौर्चे यामुळे देश पेटून उठला. साताऱ्यात प्रथम मौर्चे व नंतर भूमिगत चळवळ या स्वरुपात क्रांतिकारकांनी स्वातंत्र्याची चळवळ चालू केली यातूनच सातारचे प्रतिसरकार अस्तित्वात आले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या प्रतिसरकारचे स्वातंत्र्य लढ्यातील कार्य खूप मोलाचे होते.[१]

सातारचे प्रतिसरकारचे नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली अनेक तरुण कार्यकर्ते भूमिगत होऊन क्रांतिकार्यात सहभागी झाले. या स्वातंत्र्य संग्रामात पुरुषांप्रमाणेच अनेक जाती, धर्म व पंथांच्या स्त्रियांचा सहभाग वैशिष्ट्यपूर्ण होता. देशाच्या वेगवेगळ्या प्रांतातून ग्रामीण स्त्रियांनी केलेल्या राजकीय चळवळीचा इतिहास आजही अज्ञातच राहिला आहे. सातारचे प्रतिसरकारचे नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाने सुरु झालेल्या प्रतिसरकार चळवळीतील प्रभावी स्त्री कु. राजमती पाटील (ऐतवड्याच्या ताई) ओळखली जाते. कु.राजमती पाटील यांचे प्रतिसरकारमधील कार्य, भूमिगतांना मदत व ब्रिटिशसरकार विरुद्ध निषेध, मोर्चे, झेंडावंदन, प्रभात फेऱ्या यामधूनच सोलापूर येथील जैन श्राविकाश्रम येथील विद्यार्थी दशेपासून येरवडा जेलमधील एक धाडसी निर्भीड तरुण स्त्री क्रांतिकारक म्हणून कु. राजमती पाटील यांच्या राजकीय क्रांतिप्रवण जीवनाला महत्व प्राप्त होते. त्यांच्या या क्रांतिकार्याचा आढावा सदर शोधनिबंधामध्ये घेतला आहे.

**१) राजमती पाटील : बालपण**

राजमती पाटील यांचे गाव आजच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक हे आहे. या गावाचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात ठळकपणे कोरले गेले आहे. ते कर्मवीर भाऊराव पाटील यांचे गाव म्हणून त्यांच्याच गावात दादासाहेब बाबाजी पाटील हे जैन समाजातील एक गृहस्थ राहत होते. ते धार्मिक वळणाचे शेतकरी होते. त्यांना हिराबाई ही पत्नी व चंपाबाई, राजमती व आदगोंडा अशी ३ अपत्ये होती.[२] दादासाहेब पाटील यांच्या तीन मुलांपैकी राजमती ही तल्लख बुद्धीची होती. त्याकाळी विजेची सोय नसल्याने घरोघरी रॉकेलच्या चिमण्या (दिवा) वापरत असत. दुपारच्या वेळेत आई विश्रांती घेत असताना राजमती दिव्यामध्ये रॉकेल भरत होती. त्यावेळी दिव्याची ज्योत रॉकेलला लागल्यामुळे सर्वच आगवातीकडे पसरली. पण भीतीने राजमती किंचाळली. त्यावेळी आईने उठून प्रसंगावधान राखून डबा बाहेर फेकून दिला. त्यावेळी त्यांच्या अंगावर रॉकेल सांडल्याने त्या पेटून गंभीर जखमी झाल्या व त्यातच त्यांचा अंत झाला. आपणास वाचवताना आपली आई मरण पावली हे सत्य

राजमतीच्या मनात कायमचे राहिले. आपल्या चुकीमुळे पोरक्या झालेल्या भावास अविवाहित राहून साथ देण्याचे राजमतीने ठरवले. मोठ्या बहिणीचे लग्न झाले. पण वडिलांनी राजमतीच्या लग्नाचा विचार मांडताच तिने कडाडून विरोध केला. शेवटी लग्नाचा विचार बाजूला पडला. राजमतीने घरच्या जबाबदाऱ्या समर्थपणे उचलल्या.

**२) आचार्य समंतभद्रांची भेट : बाहुबली ब्रह्मचर्याश्रम :**

प.पू. आचार्य समंतभद्र हे पूर्वाश्रमीचे देव चंद शाह होत. त्यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे १८९१ ला झाला. सोलापूरला प्राथमिक शिक्षण घेत असतानाच ते लोकमान्य टिळकांच्या जहाल पक्षाचे कार्यकर्ते बनले. व अहिंसात्मक मार्गाने देशकार्य करण्याचे ठरविले. व राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य चालू ठेवण्यासाठी गुरुकुल शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केला.[३] स्वत: मुंबई विद्यापीठाची पदवी घेतल्यावर मुनिदीक्षा घेऊन त्यांनी १९३४ मध्ये हातकणंगले तालुक्यातील बाहुबली या ठिकाणी 'बाहुबली ब्रह्मचर्याश्रमा' ची स्थापना करून राष्ट्रीय शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांनी शील, प्रेम, ज्ञान, व्यवस्थापन आणि सेवा या पंचसूत्रीचा अंगीकार आपल्या शिक्षण पद्धतीत केला.[४] यातून तयार होणारी मुळे आदर्श समाज घटक होतील असा त्यांचा दृढ विश्वास होता. अशा प्रकारच्या आश्रमामध्ये आपल्या आदगोंडा या लहान भावास चौथीनंतरच्या शिक्षणासाठी ठेवण्यासाठी राजमती पाटील आपल्या वडिलांबरोबर बाहुबली येथे गेली. महारांजानी राजमती पाटील यांना शिक्षण घेऊन समाजकार्य करण्याचा सल्ला दिला. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणासाठी सोलापूरास राजूलमती शहांनी काढलेल्या श्राविका शिक्षण संस्थेत राहून तू शिक्षण घे असा सल्ला महाराजांनी दिला. राजमती पाटील यांना आश्रमात सामावून घेण्यासाठी चिट्ठी दिली. त्यामुळे राजमती पाटील यांनी सोलापूरला जाण्याचा निर्णय घेतला.

**३) जैन श्राविकाश्रम येथे प्रवेश व शिक्षणास सुरुवात :**

जैन श्राविकाश्रम गुंजोटी येथील श्रीमती राजुलमती शहा यांनी सोलापूरच्या फलटण गल्लीत १९२३ ला स्थापन केला. या आश्रमात विधवा, गरीब, परितक्त्या, निराधार व परावलंबी स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांना जगण्यासाठी समर्थ करणे हा उद्देश होता.[५] त्यांना लौकिक व धार्मिक शिक्षण दिले जात होते. त्यांनी पुढे प्राथमिक व माध्यमिक शाळाही सुरु केली. त्याकाळी मुलींच्या शिक्षणासाठी स्वत: खर्च करण्यास कोणीच तयार नसल्याने राजुलमती शहांनी स्वत:च्या समाजाच्या मदतीवर हा आश्रम चालविला होता. स्त्री शिक्षणाच्या वाटचालीत फार मोठा हातभार या श्राविका संस्थानने लावला आहे. अशा आश्रमात १९३६ साली राजमती पाटील शिक्षणासाठी रुजू झाली. शिक्षणाबरोबर आश्रमाच्या इतर कामातही त्यांनी प्राविण्य मिळवले. आश्रमाचे काम करून तिथे पूर्णत: मोफत शिक्षण व राहणे संचालक करत असत. राजमती पाटील यांनी लेझीम, डंबेल्य घुंगरूकाठी इत्यादी मैदानी कवायतीबरोबरच खेळाचे प्रशिक्षण ही घेतले. राजूलमती शहांनी मुलींच्या कवायती शिक्षणाची जबाबदारी राजमती पाटील यांच्यावर सोपविली. बोलक्या व निर्भीड स्वभावामुळे ती साऱ्यांची लाडकी बनली.याच श्राविकाश्रमामध्ये राजमती पाटील यांना सुमतिबाई शहा, जमुनाबाई गांधी, अनंतमती घोडके,केशरबाई शहा या जीवाभावाच्या मैत्रिणी भेटल्या.[६]

**४) सोलापूर मार्शल लॉ:**

१९३० मध्ये महात्मा गांधीनी सत्याग्रहाची घोषणा केल्यानंतर सोलापूरमध्ये वैयक्तिक व सामुदायिक सत्याग्रहांना सुरुवात झाली. व सरकारने त्यांना तुरुगांत टाकले. लोकांनी याविरुद्ध निदर्शने केली. तेव्हा सोलापूरचे कलेक्टर मि. नाईट यांनी निदर्शकांवर गोळीबार केला. त्यामध्ये शंकर शिवदारे हे पहिले हुतात्मा ठरले.[७] यामुळे टेलिग्राफ, पोस्ट ही दळणवळणाची साधने उखडून टाकण्यात आली. लोक पोलिस अधिकाऱ्यावर हल्ला करू लागले. राज्यव्यवस्था यंत्रणा कोलमडून पडली. याचाच परिणाम म्हणून १२ में १९३० ला सोलापूरमध्ये सरकारने 'मार्शल लॉ' पुकारला व सैन्यास पाचारण केले. यास जबाबदार असणाऱ्यांना दोषी ठरवून मल्लाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिंदे आणि किसन सारडा यांना १२ जानेवारी १९३१ रोजी फाशी देण्यात आली. या चळवळीच्या दरम्यान १२ मे १९३० रोजी जैन श्राविकाश्रमातील १८ वर्षे वयाच्या सुमतीबाई शहा यांनी विमलाबाई जक्कल, इंदिराबाई अंत्रोळीकर, जनाबाई जाधव अशा स्त्रियांबरोबर टिळक चौकात राष्ट्रध्वज फडकाविला. अशी राजकीय क्रांतिकारकांची पार्श्वभूमी असलेल्या श्राविकाश्रमात राजमती पाटील शिक्षण घेत होती.[८] याचा परिणाम म्हणून १९४२

च्या 'भारत छोडो' आंदोलनाचेवेळी प्रामुख्याने विद्यार्थी कामगार आणि स्त्रिया यांच्या सहकार्याने सोलापुरातील चळवळ व्यापक बनली.

**५) श्राविकाश्रमातील वास्तव्य व क्रांतिप्रवण व्यक्तित्वाची जडणघडण :**

१९३६ ते १९४२ या कालखंडात राजमती पाटील आपल्या गावी ऐतवड्यास येत तेव्हा सातारा जिल्ह्यातील चळवळीची माहिती त्यांना कळत असे व त्याची चर्चा त्या श्राविकाश्रमातील मैत्रिणीबरोबर करत. इंग्रजांना देशातून हाकलण्यासाठी आपल्या भागातील तरुण मुले जिवाचे रान करत आहेत. तुरुंगवास भोगत आहेत. याची जाणीव त्यांना व्यथित करत असे. त्यामुळे आश्रमातील इतर मैत्रिणीसह राजमती, सभा, मिरवणुका यात सहभागी होत असत.[९] आश्रमातील सुमतिबाई शहा या चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या होत्या. १९४२ च्या चळवळीतील सातारच्या प्रतिसरकारचे भूमिगत कार्यकर्ते सोलापूरला आश्रय घेत. स्वातंत्र्य लढ्यातील कार्यकर्त्यांचे योगदान, हुतात्म्यांच्या स्मृति, तसेच भाई छन्नुसिंग चंदेले,शांतिलाल शहा, तुळशीदास जाधव इत्यादी कार्यकर्त्यांच्या प्रेरणेमुळे श्राविकाश्रमातील राजमती पाटील व इतर मुलींची क्रांतिप्रवण मने व व्यक्तिमत्व घडत होते.

**६) सोलापूरातील 'चले जाव' आंदोलनातील सहभाग :**

८ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव' ठराव मुंबई येथे पास झाला. भारतभर कोट्यावधी देशबांधव स्वातंत्र्य लढ्यात उतरले. लाठीमार, गोळीबार, अटकसंत्राच्या बातम्या देशभर पसरल्या व सोलापूरचे क्रांतिकारक कैलासचंद्र मेहता, छन्नुसिंग चंदेले, भाई कस्तूरबा दोशी यांच्याबरोबर क्रांतिकार्यात सक्रिय बनल्या.[१०] राजमती १९४२ मध्ये सातवीत शिकत असतानाच या राष्ट्रीय आंदोलनाने जोर धरला त्या आपली मैत्रीण अनुसया घोडके हिच्याबरोबर शाळेसाठी बाहेर पडत पण मदत मात्र कांतिकारकांना करत. कुठे जायचे बुलेटिन्स कुठे वाटावयाची याचा कार्यक्रम क्रांतिकारी ठरवत व राजमती तास चुकवून हे काम करीत असे एवढे करून ही त्या सातवी पास झाल्या.

**७) मेरी हार्डिंग ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रवेश :**

अमेरिकन मराठी मिशनने सुरु केलेले मेरी हार्डिंग ट्रेनिंग कॉलेज हे सोलापूर जिल्ह्यातील स्त्रियांसाठी चे पहिले शिक्षिका प्रशिक्षण केंद्र होते. राजमती मूळचीच हुशार असल्याने आपल्या संस्थेच्या शाळेला भविष्यात तिचा शिक्षिका म्हणून उपयोग होईल. या दृष्टीने राजुलमती शहांनी राजमतीला मेरी हार्डिंग ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला. राजमती कॉलेजच्या वेळात बाहेर पडून टिळक चौकातील देशबांधवांच्या घरी चालणाऱ्या चर्चेत त्या सहभागी होत. त्यामुळे भित्तीपत्रके तयार करणे. बुलेटिन्स वाटणे इत्यादी काम त्या करत.

**८) सोलापूरातील टिळक चौकात तिरंगा फडकविला-राजमतीस अटक व शिक्षा:**

राजमती पाटील अतिशय धाडसी असल्याने सोलापूरातील क्रांतिकारक श्री. टिमके, प्रभु, छन्नुसिंग चंदेले, भाई विभुते शांतिलाल शहा यांच्या नियोजनानुसार ९ ऑगस्ट १९४२ ला टिळक चौकात तिरंगा फडकविण्यासाठी राजमतीचे नाव पक्के केले. ८ ऑगस्टच्या रात्री राजमतीने आपली मैत्रीण अनुसया घोडकेच्या मदतीने गरजेच्या वस्तू एका गाठोड्यात बांधल्या. त्यात आरसा, कंगवा, कागद, पेन, साड्या वगैरे वस्तू होत्या. मागील दाराने ते गाठोडे डोकीवर घेऊन रात्री एक वाजता राजमती अंधारात बाहेर पडली. व गाठोडे इच्छित स्थळी पोहचवून ती आश्रमात पुन्हा त्याच दाराने परत आली. पहाटेपासूनचे आश्रमातील नियमित कार्यक्रम शांतपणे पार पाडून ती सव्वा सात वाजता कॉलेजची पिशवी घेऊन स्वातंत्र्य लढ्यात उतरण्यास बाहेर पडली. पुढे ती कॉलेजला न जाताच टिळक चौकातील एका देशभक्ताच्या घरी गेली. ठरल्यावेळी नऊवारी साडी नेसून, ठसठशीत मोठे कुंकू लावून हातात तिरंगी झेंडा घेऊन आनंदाने भारतमातेच्या जयघोषात तिने टिळक चौक गाठला.[११] क्रांतिकारक असे आंदोलन करणार याची कुणकुण पोलिसांना होतीच पण समोर प्रत्यक्षात एका स्त्रीला पाहून गोंधलेले पोलिस व बघ्यांचा गराडा तिच्याभोवती पडला. टिळक चौकात धरपकड झाली. पोलिसांनी राजमतीला झेंडा खाली ठेवण्यास सांगितले पण तिने तसे केले नाही. व राजमतीला अटक झाली. सोलापूरच्या तुरुंगात छन्नुसिंग चंदेले होतेच. त्यांनी राजमतीस जज्जांसमोर बुलेटिन्स ठेवण्यास

सांगितले. त्यामुळे सिटी मॅजेस्ट्रेट गिरमेसाहेब यांनी तिला सहा महिने सत्याग्रहाबद्दल, तीन महिने बुलेटिन्स जज्जांसमोर ठेवून कोर्टाचा अपमान केल्याबद्दल २०० रु. दंड ठोठावला. २०० रु. न भरल्याने आणखी दोन महिने जादा शिक्षा झाली. ११ ऑगस्ट १९४२ या दिवशी तिची रवानगी येरवडा जेलमध्ये झाली.[१२]

**९) येरवडा जेल – क्रांतिकार्याचे प्रशिक्षण केंद्र :**

राजमती पाटील रात्री येरवडा जेलमध्ये आली त्यावेळी त्यांना महिला राजकैदी असलेल्या जेलच्या विभागात दाखल केले. येथेच राजमतीला अरुणा असफअली, प्रेमा कंटक, पूर्णिमा बॅनर्जी, आझाद हिंद रेडिओ संचालिका उषा मेहता, सरदार वल्लभभाई पटेल यांची कन्या मणिबेन, धुळयाच्या लीलाताई पाटील, क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई नायकवडी यांची भेट व ओळख झाली.[१३]

सोलापूरला क्रांतिचा झेंडा फडकवून या जेलमध्ये आलेली राजमती खऱ्या अर्थाने प्रशिक्षित झाली व चळवळीचे डावपेच शिकली ती येरवडा जेलमध्येच, राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकैदी यांच्या सानिध्यात राहूनच ती राजकीय चळवळीसाठी मानसिकदृष्ट्या तयार झाली. स्त्री क्रांतिकारांची तात्विक दृष्टी व कृतीशीलता अशा दोन्ही गोष्टीचा खोल परिणाम राजमतीच्या मनावर झाला. तुरुंगामध्येही राजमतीचे वागणे चांगले होते. त्यामुळे तुरुंगाधिकाऱ्यांनी शिक्षेत सूट करून राजमतीची सुटका अवघ्या सहा महिन्यात दि. १५/१/१९४३ रोजी केली. राजमती सोलापूर येथे श्राविकाश्रमात परत आली.[१४]

**१०) आश्रमाचे दरवाजे बंद :**

राजमतीला आश्रमात ठेवून घेऊन पोलिसांचा ससेमिरा मागे लावून घेण्यास आश्रमाच्या संचालिका राजुलमती शहा तयार नव्हत्या त्यामुळे राजमतीस आश्रमाचे दरवाजे कायमचे बंद झाले. सोलापूरहून सातारा जिल्ह्यात परत गेल्यावर प्रतिसरकारच्या चळवळीत काम करण्याचा ठाम निर्धार करून राजमती ऐतवड्यास परत आली.

**११) प्रतिसरकार चळवळीत प्रवेश :**

१९४२ मध्ये सुरु झालेले आंदोलन साताऱ्यामध्ये प्रतिसरकारच्या रूपाने सुरुच होते. प्रतिसरकारचे तरुण कार्यकर्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली भूमिगत राहून ब्रिटिश सरकार विरोधी कार्य करत होते. या भूमिगत कार्यकर्त्यांनी आपल्या चळवळीसाठी नऊ गट पाडले.[१५] यातील प्रामुख्याने राजमती पाटील यांचा संबंध कुंडल व वाळवा गटाशी होता. सरकारी खजिन्यावर धाडी घालणे व दळणवळणाची साधने उद्ध्वस्त करणे यासाठी काडतुसे व पिस्तुले मिळवणे ही काडतुसे व पिस्तुले आणण्यासाठी जी मोहीम आखली जाई त्यात जी.डी. लाड व नागनाथ आण्णा नायकवडी यांच्यासह राजमती पाटील ही जात असे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात एकूणच महिलांचा सहभाग कमी आहे. या काळात स्त्रियांवर सामाजिक बंधने होती. अशा प्रतिकुल परिस्थितीत कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत राजमती पाटील यांनी क्रांतिकार्यामध्ये आपला सहभाग दिला या दृष्टीने त्याच्या जैन श्राविकाश्रम ते येरवडा जेल व प्रतिसरकार चळवळीतील क्रांतिकार्यास महत्त्व प्राप्त होते.

**संदर्भ साधने :**

१) शिंदे ए.बी. साताराचे प्रतिसरकार: छोडो भारत चळवळीचे पर्व अलाईड पब्लिशर्स लि. मुंबई (१९९०), पृ. ८९-९१.

२) कोगनोळे विजय, रणरागिनी राजुताई, सुचेता प्रकाशन, सांगली (१९९८), पृ. ४.

३) कुकुंबे एस.ए., आधुनिक जैन गुरुकुल शिक्षणपद्धती आणि सामाजिक विकास, अनेकात शोधपीठ, बाहुबली. (१९९१), पृ. ५९-६१.

४) कित्ता, पृ.७३-९१.

५) शहा विद्युलता, जीवनज्योत, महाराष्ट्र महिला प्रकाशन, सोलापूर, (१९५७), पृ. २२.

६) कोगनोळे विजय, उपरोक्त, पृ. ९-१०.

७) येवले शं. भा, सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांति सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, पृ. २५-२९.

८) शहा सुमतीबाई, माझी जीवनगाथा, श्राविकाश्रम, सोलापूर, (१९८९), पृ. ९९.

९) दोशी कस्तुरबाई, क्रांतिकारक हिराचंद जोशी, श्राविका संस्था, नगर, सोलापूर, ऑगस्ट (१९९२), पृ. १७.
१०) कित्ता, पृ. १२.
११) भोसले अ.रा. इतिहास संधोधन पत्रिका, शिवाजी विद्यापीठ, इतिहास प्राध्यापक परिषद प्रकाशन, कोल्हापूर.
१२) डॉ. सौ. पद्मजा पाटील, राजमती पाटील-बिरनाळे: एक क्रांतिकारी, मालती प्रकाशन, करवीर ऑफसेट, कोल्हापूर, (२००४), पृ. ४०.
१३) कित्ता, पृ. ४०-४१.
१४) कोगनोळे विजय, उपरोक्त, पृ. १७.
१५) कोगनोळे विजय, उपरोक्त, पृ. २०.